# -: प्रेस नोट :-

**मलबार हिल पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने तक्रारदार महिलेच्या व्हॉटसअप अंकाउंटवर अश्लील संदेश, चित्रफिती व अश्लील फोटो पाठविण्याऱ्या एका अज्ञात इसमास कौशल्याने शोध घेवुन छत्तीसगड मध्ये जावुन बेडया ठोकल्या.**

दिनांक २५/०६/२०२१ रोजी सांय १८.३० वा एक महिलेने समक्ष मलबारहिल पोलीस ठाणे येथे येवून तक्रार दिली की त्यांच्या वापरत्या फेसबुक अकाऊंटवर एका सुमीत सिंग नामक व्यक्तीने फ्रेन्ड रिक्वेस्ट पाठविली होती त्यामध्ये त्यांना स्वारस्य नसल्याने त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याने त्यांना त्यांच्या वापरत्या मोबाईल वर व्हॉट्स ॲप मॅसेज मध्ये अनोळखी इसमाने त्याचा मो.क्रं. ८०८५६६५०३० वरून अश्लिल संदेश, फोटो व चित्रफिती पाठवून त्याद्वारे त्यांचा पाठलाग करून त्यांचा स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले म्हणून नमूद अनोळखी इसमाविरूध्द मलबार हिल पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक २१२/२०२१ कलम ३५४(ड) भारतीय दंड विधान संहिता सह कलम ६७(अ)माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये तात्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान गुन्हयातील पाहिजे आरोपीने वापरलेला मोबाईल क्रमांकांवरून तांत्रिक तपासान्वये निष्पन्न झालेल्या आरोपीताच्या प्राप्त पत्त्यावर राज्य छत्तीसगड येथे सपोनि डिगे व तपास पथक यांनी जावून आरोपीताची माहिती मिळवून खात्री केली व आरोपी नामे सुमीतकुमार सुरेश सिंग, वय २४ वर्षे, रा.ठी. बिजली हाऊस जवळ, कोटा जि.बिलासपुर राज्य छत्तीसगड येथून ताब्यात घेण्यात आले. गुन्हयातील त्याने वापरलेले मोबाईल व सिमकार्ड ताब्यात घेण्यात आले. मलबारहिल पोलीस ठाणेस नोंद असलेल्या गुन्हयामध्ये त्याचा सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली. दिनांक ०९/१०/२०२१ रोजी मा. न्यायालयाने आरोपीस पोलीस कोठडी दिली असून पुढील तपास करून अधिक पुरावा गोळा करण्यात येत आहे.

सदर गुन्हयामध्ये आरोपीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसताना तांत्रिक संसाधनांचा योग्य तो वापर करून क्लिष्ट स्वरूपाच्या गुन्हयाची उकल होण्याकरिता मा. पोलीस सह आयुक्त, का व सु, श्री.विश्वास नांगरे- पाटील , मा. अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि.,मुंबई श्री.दिलीप सावंत, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ डॉ.सौरभ त्रिपाठी, सहाय्यक पोलीस आयुक्त, गावदेवी विभाग श्री.राजेंद्र चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मलबारहिल पोलीस ठाणे श्री.सुर्यकांत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.अमोल टमके, सपोनि तुकाराम डिगे, पोउनि भालचंद्र घाडीगांवकर , पो.ना.मुन्ना सिंग,पो.शि.सुरेश धारवाडकर, पो.शि.स्नेहल कदम यांनी उत्कृष्ट तपास करून आरोपीतास शिताफिने तांत्रिक कौशल्याच्या आधारे निर्भया योजनेच्या पार्श्वभूमीवर अधिक सजगपणे पाठपुरावा करून अटक केले आहे.

(सुर्यकांत बांगर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई.